महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमीअभिलेख (म.राज्य ) , पुणे
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत , विधानभवन समोर , कॅम्प , पुणे

https://mahabhumi.gov.in **HELPLINE NUMBER- 020- 25712712**

---

जा.क्र.तलाठी भरती/२०२३/प्रसिध्दी /९११/२०२३ दिनांक :- १९/०८/२०२३

# तलाठी सरळसेवा भरती -२०२३

## जाहिर सूचना

महाराष्ट्र राज्यातील महसूल विभागातील तलाठी (गट -क) संवर्गाचे सरळसेवा पदभरती बाबतची जाहिरात क्र.४५/२०२३ दि.२६/६/२०२३ प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर भरती प्रक्रियेची परिक्षा दि.१७/०८/२०२३ ते दि.१४/०९/२०२३ या कालावधीत आयोजित करणेत आलेली आहे. तलाठी भरती परीक्षा दि.१७/०८/२०२३ रोजी पासुन राज्यातील विविध केंद्रावर सुरु झालेली आहे.

परीक्षार्थी यांनी परीक्षा केंद्रामध्ये मोबाईल, ब्लुटयुथ, घडयाळ व इतर इलेक्ट्रॉनिक्स साहित्य नेण्यास प्रतिबंधित केलेले आहे. त्याबाबत जाहिरातीमध्ये तसेच प्रवेशपत्रावर स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, काही परीक्षार्थी हे परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश करताना दिलेल्या सूचनांचे पालन करीत नाहीत. परीक्षा केंद्रावर तपासणी करताना परीक्षार्थीकडे आक्षेपार्ह साहित्य आढळून आल्यास अशा परीक्षार्थी विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी /-XXX
**(आनंद रायते)** भा.प्र.से
**राज्य परिक्षा समन्वयक तथा**
**अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे**